# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## शुक्रवार, दिनांक १७ मार्च, २०२३

## (सकाळी ०९.३० ते १०.४५ वाजेपर्यंत)

अप्रकाशित प्रत

**लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

(१) **श्री. संतोष बांगर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"शासन विविध शासकीय कार्यालयामध्ये सेवाभावी संस्थेमार्फत विविध कंत्राटी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करीत असणे, यामध्ये १०२ कंत्राटी रुग्णवाहिका चालक, स्वच्छता कर्मचारी, इतर कर्मचारी, डाटा एन्ट्री ऑपरेटर, ३३ **KV** सब स्टेशन कंत्राटी ऑपरेटर ईत्यादी कर्मचारी हे शासकिय कार्यालयामध्ये सेवाभावी संस्था मार्फत नियुक्त करण्यात येत असणे, परंतु सेवाभावी संस्था चालक हे शासनाने ठरवून दिलेले वेतन संबंधितांना न देता तुटपुंजे वेतन देत असल्याचे निदर्शनास येणे, यामध्ये महावितरण मधील ३३ **KV** सब स्टेशन मधील कंत्राटी ऑपरेटर म्हणून काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची बँक खाती स्वत: जवळच ठेवून शासनाने त्यांच्या खात्यावर टाकलेला पगार परस्पर उचलून ऑपरेटरला मात्र कमी पगार देण्याचे प्रकार घडत असल्याचे उघडकीस येणे, तसेच महाराष्ट्रातील १०२ कंत्राटी रुग्णवाहिका चालकांना शासन १९ हजार ९०० रु प्रमाणे वेतन ठेकेदारास अदा करत असतांना ठेकेदार मात्र ८ ते १० हजार रुपये चालकांना देत असणे, तसेच त्यांचे मानधन चार-चार महिने अडवून ठेवण्यात येत असणे, त्यामुळे ज्या-ज्या शासकीय कार्यालयामध्ये सेवाभावी संस्थामार्फत कंत्राटी कर्मचारी नियुक्त करण्यात येत आहेत त्या सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासन नियमाप्रमाणे मानधन देऊन ते मानधन प्रत्येक महिन्याला अदा करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"डहाणू नगर परिषदेचा विकास आराखडा सन २०१६ पासून, उर्वरित डहाणू तालुक्याचा प्रादेशिक आराखडा सन २०१९ पासून राज्य सरकारच्या मंजुरीच्या प्रतीक्षेत

असणे, हे दोन्ही आराखडे मंजूर न झाल्याने डहाणू तालुक्याचा विकास खुंटला जाणे, सुमारे २० वर्षांपूर्वी डहाणू नगर परिषद क्षेत्रासाठी विकास योजना तयार करण्यात आली होती, मात्र पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील व नाजूक असल्याचे कारण सांगून या योजनेला सरकारने मंजुरी दिलेली नसणे, विकास योजनेचा आराखडा केंद्रीय वन व पर्यावरण मंत्रालयाकडे पाठवल्यानंतर तसेच या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने निवृत्त न्यायाधीशांच्या समितीसमोर ही बाब पडताळल्यानंतर आराखड्याला राज्य सरकारने आपल्या स्तरावर मंजुरी देण्याचे निर्देश दिले असणे, सन २०१४-१५ च्या सुमारास या आराखड्यावर हरकती मागून त्याची सुनावणी घेण्यात येऊन तज्ञ समितीने हा आराखडा शासनाकडे मंजुरीसाठी पाठवलेला असणे, तर डहाणू तालुका पर्यावरण संरक्षण प्राधिकरण अस्तित्वात असल्याने या आराखड्याला प्राधिकरणासमोर सादर करून औद्योगिक वापराच्या क्षेत्रावर मर्यादा आखून देऊन आराखडा सशर्त मंजूर करण्यात येणे, परंतु उर्वरित तालुक्यासाठी प्रादेशिक आराखडा मंजूर नसल्याने हे प्रकरण अद्यापी प्रलंबित असणे, विकास आराखडे मंजूर न झाल्याने त्याचा फटका डहाणूतील नागरिकांना बसणे, डहाणू नगरपालिका क्षेत्रात यूडीसीपीआर लागू करणे व प्रादेशिक आराखड्याला मंजुरी न दिली गेल्याने डहाणूमधील रहिवासी भागाचा विकास तसेच पर्यटनाला चालना मिळण्यास अडथळे निर्माण झाले असणे, परिणामी, अनधिकृत बांधकाम प्रकार वाढलेले असणे, डहाणूच्या विकास आराखड्यात सर्वसमावेशक आरक्षण (अकामोडेशन रिझर्व्हेशन) तसेच हस्तांतरित होणारे विकास हक्क (ट्रान्सफरेबल डेव्हलपमेंट राइट्स-टीडीआर) यांचा समावेश केल्यास आरक्षण क्षेत्राचा झपाट्याने विकास होण्याची गरज, मात्र विकास आराखड्याच्या मंजुरीसोबत या तरतुदींना मान्यता मिळण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

**(३) श्रीमती सीमा हिरे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

“राज्यात नाशिक महानगरपालिका हद्दीमध्ये सर्वे नंबर २५० मौजे म्हसरूळ शिवार नाशिक येथील मिळकतीचे नाशिक महापालिकेने भूसंपादन करून त्या बदल्यात विकास हक्क प्रमाणपत्र (डी आर सी/ टी डी आर) हे नाव विकास क्षेत्र मूल्यांकन विभाग (१६.१४) च्या बदल्यात मूल्यांकन विभाग (१६.२२) बदल करून अंदाजे ८० करोड चे अतिरिक्त बिल्टप क्षेत्राचे डीसीआरसी/टीडीआर मूल्यांकन झोन बदलले असल्याचे सन २०१८ मध्ये निदर्शनास येणे, याप्रकरणी नाशिक महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांनी परस्पर संगनमत करून शासनाची व नाशिक महानगरपालिकेची फसवणूक केली असल्याचा जनतेमध्ये निर्माण झालेला संशय, यासंदर्भात चौकशी करून संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची जनतेकडून होत असलेली मागणी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

अग्रिम प्रत

**(४) श्री. रवि राणा, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"अमरावती जिल्ह्यातील भातकुली तहसील व इतर कार्यालयासह संबंधित शासकीय कार्यालय तथा कर्मचारी निवासस्थान एका ठिकाणी बांधकाम करण्यासाठीचा प्रस्ताव मंजूर करण्याच्या संबंधाने राज्यांचे विद्यमान महसूल मंत्री यांनी आदेश जिल्हाधिकारी, अमरावती यांना दिले असूनही अद्यापपर्यंत सदरचा प्रस्ताव सरकार कडे पाठविला नसल्याबाबत ज्यामध्ये खालील कार्यालयाचा समावेश आहे त्यामध्ये भातकुली तहसील कार्यालय चे ठिकाणीं भातकुली जैन येथे तालुका स्तरीय कार्यालये जसे की पंचायत समिती कार्यालय, उपकोषागार कार्यालय, वन विभागाचे कार्यालय, क्रीडा विभागाचे कार्यालय, जिल्हा परिषद बांधकाम विभाग, उपविभाग कार्यालय ,तालुका भूमी अभिलेख कार्यालय, सार्वजनिक बांधकाम उपविभाग कार्यालय ,महिला बाल विकास विभाग कार्यालय, तालुका वैद्यकीय अधिकारी विभाग कार्यालय, व तालुक्यासंबंधित इतर कार्यालयाचे बांधकाम कर्मचारी निवासस्थान अमरावती जिल्ह्यातील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी राज्याचे माननीय महसूल मंत्री यांना डिसेंबर २६/१२/२०२२ रोजी मागणी केली असणे, ही मागणी माननीय महसूल मंत्री महोदयांनी गंभीरतेने घेऊन जिल्हाधिकारी अमरावती यांना त्यांचे कार्यालयाचे आदेश क्रमांक ८१/२०२३ तारीख दिनांक १६ जानेवारी, २०२३ रोजी च्या दरम्यान जिल्हाधिकारी अमरावती यांना तातडीने कार्यवाही करण्यासंबंधी लेखी आदेश दिले असणे, त्यानंतरही अद्यापपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयाकडून कोणत्याही प्रकारची कार्यवाही दिसून न येणे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी पुन्हा दिनांक २२ फेब्रुवारी, २०२३ रोजी च्या दरम्यान जिल्हाधिकारी अमरावती यांना वरील प्रमाणे प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत निर्देशित केली असणे, या अनुषंगाने आज रोजी पर्यंत कोणत्याही कारवाई झाल्याचे दिसून येणे, भातकुली येथील तालुक्याचे स्थळी वंचित असलेल्या शासकीय कार्यालय तथा कर्मचारी निवासस्थान इमारत बांधकाम करण्यासाठी जागा व निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने निर्णयात्मक आदेश निर्गमित करण्याची कार्यवाही करणे याबाबत शासनाने तातडीने करावयची कार्यवाही व उपाययोजना."

**(५) श्री. हरिभाऊ बागडे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे दुग्ध व्यवसाय विकास मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

“महाराष्ट्रात दुग्ध व्यवसाय हा पूर्वी सरकार व सहकार यांच्या माध्यमातून केला जात असणे, शहरात किंवा मोठ्या गावात खाजगी व्यक्ती शेतकरी लोकांची गरज म्हणून गायी, म्हशी पाळून हा व्यवसाय करीत असणे, आजही काही प्रमाणात हा व्यवसाय चालूच असणे, सहकाराच्या माध्यमातून गावोगाव दुध संकलन सहकारी संस्था स्थापन

अप्रकाशित प्रत

होऊन हे दूध तालुका संघ, जिल्हा संघामार्फत त्यावर प्रक्रिया करुन पिशवी बंद करुन मोठ्या प्रमाणात शहरी, निमशहरी भागात विक्री करीत असणे, राज्यातील तालुका संघ, जिल्हा सहकारी दुध उत्पादक संघ स्थापन होऊन एक महासंघ तयार करण्यात येणे, त्यासाठी शासनाने मोठी जागा देऊन गोरेगाव मुंबई येथे दूध व दुधापासून बनवलेल्या पदार्थांची निर्मिती करून मुंबईत विक्री करीत असणे, या महासंघाची व वेगवेगळया जिल्ह्यात जिल्हा संघ व तालुका संघाची मोठी गुंतवणूक असणे, त्याचबरोबर कर्मचाऱ्यांची मोठी संख्या कार्यरत असणे, पण राज्यात खाजगी किंवा कंपनीद्वारे मोठ-मोठे प्लॅन्ट टाकून राज्यभर दुध संकलन करत असणे, यामुळे ज्या गावातून सहकारी दुध संस्था दुध संकलन करीत असे, त्याच गावात एक, दोन, तीन असे वेगवेगळया व्यक्ती दुध गोळा करणे, त्याचा परिणाम दुध सहकारी संस्था बंद होत असणे, दुध संस्था बंद होणे म्हणजे तालुका, जिल्हा सहकारी संघ व पर्यायाने महासंघ अडचणीत येणे, त्यामुळे कोट्यावधी रुपयाची गुंतवणूक व कर्मचारी वर्ग यांचाही रोजीरोटीचा प्रश्न निर्माण होणे, यासाठी सहकार क्षेत्रामार्फत चालविल्या जाणारा दुग्ध व्यवसाय वाचविण्याची निर्माण झालेली आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

**(६) सर्वश्री. राजेश टोपे, जयंत पाटील, छगन भुजबळ, संजय बनसोडे, शेखर निकम, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

“शासनाने दिनांक २४ नोव्हेंबर, २००१ नंतर राज्यातील नविन महाविद्यालयाच्या बाबतीत कायम विनाअनुदानित धोरण स्वीकारलेले असणे, त्याअनुषंगाने सदर धोरण दिनांक २४ नोव्हेंबर, २००१ पूर्वीच्या वरिष्ठ महाविद्यालयांना लागू होत नसल्यामुळे ७८ वरिष्ठ महाविद्यालयांना सरसकट १०० टक्के अनुदान मंजूर करण्याबाबत मागील २२ वर्षापासून अविरतपणे शासनास निवेदने देवूनही प्रश्न प्रलंबित असणे, याबाबत अनेकवेळा उपोषण व आंदोलने महाराष्ट्र राज्य कृती समिती मार्फत करण्यात येणे, ७८ वरिष्ठ महाविद्यालयांपैकी किती महाविद्यालये सुरु असून अनुदानाच्या धोरणानुसार किती महाविद्यालयांनी अनुदानाचे निकष पूर्ण करण्यात आले, याबाबतची पडताळणी झालेली असून आर्थिक भारासह अद्ययावत परिपूर्ण प्रस्ताव मा.मंत्रीमंडळाच्या मान्यतेसाठी मागील १५ महिन्यापासून आजपर्यंत अनुदान मिळणेबाबत प्रलंबित असणे, तसेच एकीकडे शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय दिनांक ६ फेबुवारी, २०२३ अन्वये कायम विनाअनुदान तत्वावर मान्यता दिलेल्या व कायम शब्द वगळून तसेच त्रुटी व निकषांची पूर्तता केलेल्या खाजगी प्राथमिक/माध्यमिक/उच्च माध्यमिक/कनिष्ठ महाविद्यालये वर्ग व तुकडयांना अनुदानास पात्र घोषित करुन अनुदान मंजूर केलेले असणे तर दुसरीकडे उपरोक्त वरिष्ठ महाविद्यालयांना सर्व त्रुटी व निकषाची पूर्तता करुन व अनुदानास पात्र असून देखील अद्यापपर्यंत अनुदान देणेकामी टाळाटाळ होत

असल्याचे निदर्शनास येणे, सर्व ७८ वरिष्ठ महाविद्यालयांपैकी ग्रामीण व दुर्गम भागातील असल्याने अनुदान न मिळाल्याने वेतनाअभावी प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी व पर्यायाने त्यांच्यावर अवलंबून असलेल्या त्यांच्या संपूर्ण कुटुंबिय यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न उद्‌भवणे, परिणामी त्यांच्यामध्ये पसरलेला तीव्र असंतोष, त्याबाबत शासनाने तातडीने केलेली कार्यवाही व उपाययोजना."

**(७) श्री. राम सातपुते, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सोलापूर विद्यापीठाच्या कुलगुरू यांनी मनमानी कारभार करून विद्यार्थ्यांसह विद्यापीठाचे आर्थिक नुकसान केल्याची अत्यंत गंभीर बाब निदर्शनास येणे, कोरोना महामारीच्या काळात पदवी व पदवीत्तर ऑनलाईन परीक्षेचे कंत्राट देताना कुठल्याही नियमांचे पालन न करता आपल्या मर्जीतील कंपनीला आर्थिक व्यवहार करून अव्वाच्या सवा दराने कंत्राट दिल्याचेही निदर्शनास येणे, कोरोना महामारीच्या काळात ऑनलाईन पद्धतीने परीक्षा घेतल्या असताना देखील प्रश्नपत्रिका छपाईच्या नावाखाली करोडो रुपये उचलल्याचा गंभीर प्रकार देखील झाला असल्याची बाब निदर्शनास येणे, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या २०१९ क्रीडा महोत्सवासाठी मैदाने तयार करताना खुली निविदा न काढता आपल्या मर्जीतील लोकांना कंत्राट देऊन विद्यापीठाचे मोठे आर्थिक नुकसान करून आर्थिक गैरव्यवहार केल्याचा प्रकार देखील निदर्शनास येणे, हे सर्व करत असताना विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांना विश्वासात न घेता स्वतःच्या अधिकारांचा वापर करून आर्थिक गैरव्यवहाराच्या उद्देशाने कुलगुरू यांनी सर्व निर्णय घेतले असल्याची बाब देखील निदर्शनास येणे, या सर्व बाबींची विशिष्ट समितीमार्फत चौकशी करून जबाबदार असणाऱ्यांवर कठोर कार्यवाहीची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपायोजना."

**(८) श्रीमती नमिता मुंदडा, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"बीड जिल्ह्यामध्ये जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येत असलेल्या जल जीवन मिशनयोजने मधील अनियमिततेबाबत अप्पर जिल्हाधिकारी, बीड यांच्या अध्यक्षतेखाली ०६ सदस्यीय चौकशी समितीच्या अहवालातील दोषीवर कार्यवाही करण्यासाठी जिल्हाधिकारी, बीड यांनी सदर अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प, बीड यांच्याकडे पाठवला असणे, परंतु प्रत्यक्षात बीड जिल्ह्यातील जलजीवन मधील सर्व घोटाळा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, बीड यांच्या संमतीने झाला असणे, लोकप्रतिनिधी, लोकांच्या तक्रारी, वर्तमानपत्रात वारंवार बातम्या येत असतानाही

कार्यवाही करण्याऐवजी दुर्लक्ष करून जलजीवनची कामे देतांना संबंधित एजन्सीना गंभीर त्रुटी असतांना कामे वाटप केलेली असणे, तसेच त्याच विभागातील कर्मचाऱ्यानी निविदा प्रक्रियेत अनियमितता करत स्वतःच्या मर्जीतल्या व नातेवाईकांच्या संस्थाना व ज्यांनी सर्वे व अंदाजपत्रके तयार केली त्या अभियांत्रिकी सल्लागार  यांनाच नियमबाह्य कामे दिली असणे, या सर्व अनियमिततेला मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, बीड यांनी न थांबवता पाठीशी घालून अनियमितता होऊ दिली असणे, त्यामुळे जलजीवनाच्या कामात झालेल्या भ्रष्टचाराला व अनियमिततेला प्रमुख म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. बीड. हे जबाबदार असणे, त्यामुळे त्यांच्यासह अप्पर जिल्हाधिकारी, बीड यांच्या अहवालातील दोषी अधिकारी, कर्मचारी, कॉन्ट्रॅक्टर, यांच्यावर कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(९) श्रीमती प्रतिभा धानोरकर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"केंद्र शासन व महाराष्ट्र शासनातर्फे राष्ट्रीय आरोग्य अभियानामार्फत (**NRHM**) कर्मचाऱ्यांची नियुक्ती केलेली असणे, सदर कर्मचारी १५ ते २० वर्षापासून कंत्राटी पदावर कार्यरत असणे, कोरानामध्ये जीवावर उदार होऊन कामगिरी पार पाडलेली असणे, याच अभियानात गुजरात, राजस्थान मध्ये या कर्मचाऱ्यांना शासकिय सेवेत कायम स्वरुपात सामावून घेतले जात असणे, महाराष्ट्र शासनामार्फत कुठलीही कार्यवाही केली जात नसणे, केंद्रीय व राज्य सरकार मार्फत ६० टक्के व ४० टक्के या कर्मचाऱ्यांना वेतन देत असणे, इतर राज्यात कायमस्वरुपी सेवेत सामील केले असणे, त्यामुळे महाराष्ट्र राज्यातील या अभियांनाच्या कर्मचाऱ्यांना दुजाभावाची वागणूक निर्माण होत असणे, राज्यातील या अभियानात काम करणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांची शासकिय सेवेत कायम स्वरुपी सामावून घेण्याची मागणी होत असणे, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(१०) श्री. वैभव नाईक, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"कुडाळ (जि.सिंधुदुर्ग) येथे १०० खाटांचे जिल्हा महिला व बाल रुग्णालयास माहे जानेवारी, २०१३ मध्ये मान्यता देण्यात येणे, तद्नंतर माहे जुलै, २०१३ मध्ये सदर रुग्णालयाच्या नवीन इमारतीच्या बांधकामासाठी  १४ कोटी रुपये मंजूर करण्यात येणे, सन २०१४ मध्ये इमारतीच्या बांधकामास प्रत्यक्ष सुरुवात करण्यात येऊन उक्त रुग्णालयाची इमारत उभारण्यात येणे, त्याच प्रमाणे सदर रुग्णालयाकरीता गट-अ ते गट-क ची नियमित ४२ पदे व काल्पनिक कुशल, अकुशल पदे ३ अशी पदे माहे जुलै, २०१९ मध्ये मंजूर करण्यात येणे, त्यापैकी आतापर्यंत केवळ १८ पदे भरण्यात आले

अग्रिम प्रत

असून उर्वरीत तब्बल २९ पदे रिक्त असणे, त्याच प्रमाणे सदर रुग्णालयाच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले असले तरी अंतिम टप्प्यातील अनेक कामे निधी अभावी रखडणे, रुग्णालयाच्या या नव्या इमारतीमध्ये रुग्ण सेवेसाठी आवश्यक असलेली उपकरणे, यंत्रसामुग्री, फर्नीचर, रुग्णवाहीका, विद्यूत पुरवठा, सी.सी.टी.व्ही. उपहारगृह व इतर अनेक कामे निधी अभावी रखडलेले असणे, अपूर्ण असलेली काम करण्याकरीता आवश्यक तो निधी उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच मंजूर असलेली रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाकडे वारंवार जिल्हा प्रशासनाकडून प्रस्ताव सादर करण्यात येणे, तथापी शासनाकडून अद्यापही उक्त प्रस्तावास मंजूर न मिळणे, परिणामी कुडाळ येथील १०० खाटांचे जिल्हा महिला व बाल रुग्णालय रुग्णांच्या सेवेसाठी सक्षमपणे सुरु न होणे, परिणामी जिल्ह्यातील नागरीकांमध्ये पसरलेली नैराश्याची भावना, शासनाने यासंदर्भात तातडीने निर्णयात्मक कार्यवाही करुन उक्त रुग्णालयचे अपूर्ण अवस्थेत असलेली कामे पूर्ण करण्याकरीता आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्याची व मंजूर असलेली रिक्त पदे भरण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.''

**(११) श्री. सुनिल भुसारा, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"पालघर जिल्ह्यातील टेंभा खर्डी जव्हार जामसर बोपदारी रुईघर या हायब्रीड अन्युटी अंतर्गत एमयु ३ प्रकल्प कामाची मूळ किमत १४६.१६ कोटी असणे, त्याअनुषंगाने कार्यारंभ आदेश दिनांक २३.१०.२०१८ रोजी देण्यात येणे, या प्रकल्पाची दिनांक २३.१०.२०२८ पर्यंत देखभाल दुरुस्तीची मुदत असणे, तसेच दिनांक २९.१२.२०१८ ते २६.१०.२०२१ या कालावधीत संबधित ठेकेदार यांना १७७.९५ कोटी रुपयाचे बिल अदा केल्याचे निदर्शनास येणे, ही अदा रक्कम मूळ प्रशासकीय मान्यतेपेक्षा जास्त असणे, मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग कोकण यांनी दिनांक ०३.०८.२०२१ रोजी या प्रकल्पाचा पुन्हा सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव शासनास सादर करणे, शासनाने शासन निर्णय दिनांक २१.०२.२०२३ नुसार या प्रकल्पास सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करणे, सदर प्रकल्पासाठी पुन्हा नविन सुधारित प्रशासकीय मान्यता रक्कम रुपये २३५.३९ कोटी रुपयाची देणे. सदर रस्त्याचे काम पूर्ण झालेले असणे, तसेच बिल अदा केलेले असणे, तसेच दिनांक २३.१०.२०२८ पर्यंत देखभाल दुरुस्ती मुदत असणे असे असतानी प्रकल्पाची रक्कम जाणीव पूर्वक फुगवणे तसेच मूळ प्रशासकीय मान्यतेपेक्षा जास्त रक्कम ठेकेदारास अदा करणे, या अनियमिततेसाठी मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता आणि कार्यकारी अभियंता तसेच क्षेत्रीय स्तरावरील अधिकारी जबाबदार असणे, त्यामुळे पालघर जिल्ह्यात या अनियमिततेबाबत चर्चा सुरु असणे, या प्रकल्पावर यापुढील अनियमितता रोखणेसाठी सदर काम रद्द होण्याची आणि संबंधित जबाबदार अधिकारी यांचेवर कार्यवाही करणेची नितांत आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**( सकाळी ११.०० वाजता )**

**एक : प्रश्नोत्तरे.**

**दोन : कागदपत्र सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

**मुख्यमंत्री** : महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग यांचे सन २०१८-२०१९ व २०१९-२०२० या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

**(१) श्री. संजय रायमुलकर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"बुलढाणा जिल्हयातील खामगांव येथील स्थानिक रावण टेकडीस्थित डंम्पिग ग्राऊंडवरील कचऱ्याला आग लागण्याच्या सातत्याने घटना घडत असून दिनांक १२.२.२०२३ रोजी अचानक मोठया प्रमाणात आग लागून धुराचे लोळ परिसरात पसरणे, रावणटेकडी, किसननगर, गोपाळ नगर, घरकूल, घाटपुरी नाका हा परिसर विषारी धुरात हरविल्याने तेथील आबाल-वृध्द नागरिकांना श्वसनाचा त्रास होणे, वारंवार या डंपिंग ग्राऊंडला आग लागत असल्याने नागरिकांमध्ये आग लावत असल्याचा निर्माण झालेला संशय, शहरातून कचरा संकलन करुन त्या कचऱ्याद्वारे खत निर्मिती करीत असताना गेल्या काही महिन्यापासून कच-यापासून खत तयार करण्यात न येणे, यामुळे या कचऱ्यांचे ढिग मोठया प्रमाणात साचणे, या सततच्या आगीच्या घटनांची चौकशी करुन कारवाई करण्याची मागणी करण्यात येणे, असे असतांनाही कोणतीच कारवाई होत नसल्याने सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने चौकशी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही, शासनाची प्रतिकिया व भूमिका."

**(२) सर्वश्री. विनोद अग्रवाल, विजय रहांगडाले, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"पूर्व विदर्भातील गोंदिया जिल्हा हा नक्षलग्रस्त तथा आदिवासी बहुल जिल्हा असुन गोंदिया शहर जिल्हा मुख्यालय तथा मुख्य रेल्वे मार्गाने जोडलेले असणे, शहरामध्ये वैद्यकीय महाविद्यालय तथा व्यापारी केंद्र असल्याने जिल्हा सिमेलगतच्या मध्यप्रदेश, छत्तीसगड परराज्यांसह शेजारच्या जिल्ह्यामधुन दरोज हजारो नागरिकांचे कामानिमीत्य आवागमण असणे, गोंदिया शहर जिल्हा मुख्यालय असल्याने तथा जिल्ह्यामध्ये रोजगाराची संधी उपलब्ध असल्याने नोकरदार वर्ग तथा कामगार/मजुर वर्गाचे शहरामध्ये वास्तव्याला असणे, शहराची लोकसंख्या २ लक्षपेक्षा जास्त असुन शहरातील नागरिकीकरणामुळे दररोज नव-नविन वसाहतींची भर पडत असतांना मुलभूत सोई-सुविधांचा अभाव असणे, गोंदिया नगर पालीका १०० वर्षे जुनी असुन मुलभूत सोइ-सुविधांचा शहरातील कचऱ्यांची विल्हेवाट लावण्यास डंपीग वार्ड किंवा घनकचरा प्रक्रीया व्यवस्थापन प्रकल्प नसणे, शहरामध्ये दररोज १०० टनपेक्षा जास्त कचरा निर्माण होणे, सदर कचऱ्याची उचल न झाल्याने जागो-जागी कचऱ्यांचे ढिगारे निर्माण होणे, शहरातील साफ-सफाईकडे नगरपालिका प्रशासनाचे अक्षम्य दुर्लक्ष असणे, नगरपालिकेमध्ये साफ-सफाईकरीता ४००-५०० कर्मचारी असतांनाही दररोज शहरामध्ये साफ-सफाई तथा कचऱ्याची उचल न होणे, त्यामुळे सर्व धुळीमुळे नागरिकांमध्ये दम्यासारखे आजार होत असणे, दररोज कचरा उचल होत नसल्याने शहरामध्ये दुर्गंधी युक्त वातावरण निर्माण होऊन नागरीक जीव मुठीत घेऊन जगणे, शहरामध्ये रोगराई पसरणे, त्यामुळे नागरिकांमध्ये मोठ्याप्रमाणात असंतोषाचे वातावरण निर्माण होऊन नगरपालिकेवर मोर्चा/ आंदोलने नित्याची बाब झाली असणे, नगरपालिका १०० वर्षे जुनी असतांना आजपर्यंत कचरा विल्हेवाटीकरीता कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नसणे, शहरातील कचरा शहराबाहेरील मोकळ्या जागेवर फेकण्यास लगतच्या गावातील नागरिक मनाई करणे, कचरा गाड्यांवर प्रतिबंध करणे, राज्य शासन, नगरपालिका प्रशासन तथा स्थानिक लोकप्रतिनिधी विरूध्द वातावरण निर्माण होऊन कायदा व सुवस्थेचा प्रश्न निर्माण झाला असणे, शहरातील कचऱ्याचे विल्हेवाटीकरीता जागा उपलब्ध नसल्याने एम.आय.डी.सी. तील जागेशिवाय दुसरा पर्याय नसणे, त्याचप्रमाणे शहरातील पाणी पुरवठा व्यवस्था ५० वर्षे जुनी असुन शहरामध्ये मोठ्या प्रमाणात होत असलेल्या नागरिकीकरणामुळे नागरिकांना १५ मिनीटांपेक्षा जास्त वेळ पाणी मिळत नसणे, शहरामध्ये पाणी पुरवठा करण्यात येत असलेल्या डांगुर्ली पाणी पुरवठ्यामध्ये उन्हाळ्यामध्ये पाणी उपलब्ध राहत नसल्याने याचा विपरीत परिणाम शहरातील पाणी पुरवठ्यावर होऊन नागरिकांना पिण्याचे पाण्याकरीता भटकंती करावी लागत असणे, डांगुर्लीपाणी पुरवठा योजनेकरीता त्याठीकाणी डांगुर्ली बॅरेजचे बांधकाम करणे अत्यंत आवश्यक झाले असणे, नगरपालिका प्रशासनाने वाढीव तथा पर्यायी पाणी पुरवठ्याकरीता धापेवाडा परियोजनेतुन अमृत योजने अंतर्गत रू.२७० कोटींचा शासनाला सादर केलेल्या प्रस्तावाला मंजुरी प्राप्त होणे अत्यंत गरजेचे

असणे, शहरामध्ये भूमीगत गटार योजने काम सुरू असणे, ठिक-ठिकाणी गटार योजनेकरीता खोदकाम करण्यात आले आसणे, परंतु खोदकाम करीताअसतांना कोणत्याही मापदंडासह तथा बांधकाम दर्जानुसार करण्यात येत नसणे, सदर योजनेच्या खोद कामामुळे शहरातील रस्त्यांची दुरावस्था झालेली असुन नागरिकांना रहदारीकरीता मोठ्या प्रमाणात अडचणी निर्माण होत असणे, योजनेतील खोदकाम करीता असतांना कंत्राटदार आपली मनमाणी करीत असणे, नागरिकांच्या तक्रारीची नगरपालिका प्रशासनाकडुन दखल घेण्यात येत नसणे, एकंदरच गोंदिया शहरातील कचऱ्याचे विल्हेवाटीमुळे पसरलेली रोगराई, पिण्याचे पाण्याची कमतरता तथा भूमीगत गटार योजनेच्या खोद कामामुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेल्या असंतोषाचे वातावरण, यावर शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही तथा उपाययोजना.”

**(३) श्री.कालिदास कोळंबकर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

“बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम मुंबई, नवीमुंबई, ठाणे, मिरा-भाइर्दर शहरात वीज पुरवठा व बससेवा उपलब्ध करणारी सार्वजनिक क्षेत्रातील 'बेस्ट' परिवहन उपक्रम १८४७ मध्ये देश स्वतंत्र होण्याच्या एक आठवडा पुर्वी मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत असणे, दरम्यानच्या कालावधीत बेस्टच्या अधिकारी कर्मचाऱ्यांनी प्रवाशांना अल्पदरात सौजन्यपूर्ण सेवा देऊन विद्युत विभागाच्या मार्फत विद्युत सेवाही चोख दिली असणे, सद्य:स्थितीत बेस्ट आस्थापनेवर सुमारे २९ हजार कर्मचारी वर्ग आणि प्रवाशांच्या सोयीकरिता साधारण ३५०० बसेस रस्त्यावर धावत असल्याचे निदर्शनास येणे, सार्वजनिक उपक्रम व्यवस्थेत मुंबईची बेस्ट सेवा अप्रतिम सेवा म्हणून देशांतर्गत सर्व राज्यात ख्याती असणे, अशा या बेस्ट सेवेतील अधिकारी व कर्मचार्यांना महानगरपालिकेकडून कर्ज घेऊन मासिक वेतन देण्याची वेळ येणे, हा उपक्रम मुंबई महानगरपालिकेतंर्गत चालविण्यात येत असताना याचे खाजगी करण करण्याची चर्चा सुरु असणे, तथापी बेस्ट उपक्रम हा महानगरपालिकेच्या अंतर्गत ठेवण्याची गरज, मुंबईत या उपक्रमाची ३५० एकर उद्योग संकुल व ७५ एकर निवासी संकुल जागा उपलब्ध असताना व तेथील निवासी संकुलच्या १२ एकरच्या जमिनीवर वसाहतीची जागा शासकीय भावाने विकून ५०० स्के.फुटची घरे त्यावसाहतीत सद्या रहात असलेल्या कर्मचाऱ्यांना मार्केट भावाने देवून अन्य जागा विकल्यास बेस्टचा आर्थिक फायदा होऊन कर्मचार्यांचाही फायदा होणार असणे, तसेच त्यांच्या सेवा निवृत्तीनंतर ते बेस्ट वसाहतीत रहात असलेले निवासस्थान ज्यांचे वारस बेस्ट सेवेत आहेत त्यांच्या नावावर अथवा वारस बेस्ट सेवेत नसल्यास निवृत्त होणार्या बेस्ट अधिकारी/कर्मचारी यांच्या नावावर करुन देण्यात येणे, म्हणून बेस्ट संघटनांकडून वारंवार होत असलेली मागणी, बेस्टच्यासेवेत उभे आयुष्य खर्च केल्यानंतर मिळणार्या वेतनात मुंबईत स्वत:चे निवासस्थान घेवू न शकलेल्या बेस्ट कर्मचार्यांची संख्या ९० टक्के असून या कर्मचार्यांना मुंबई बाहेरील स्थलांतरीत वावे लागू

अग्रिम प्रत

नये म्हणून त्यांना मुंबईत अथवा नवीमुंबई, ठाणे, मिरा-भाईदर परिसरात बाजारमुल्य दरात स्वत:चे घर उपलब्ध होण्याच्या दृष्टीने शासनाने मुंबई पोलिसांच्या धर्तीवर धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता, या कर्मचार्यांपैंकी बहुतांश कर्मचारी मुंबईच्या मातीतील मुळ रहिवासी असल्याने त्यांना मुंबईत स्वत: निवासस्थान उपलब्द करण्याकरिता शासनाने उचित निर्णय घेवून त्यांच्या भविष्याची चिंता दूर करण्याकरिता व बेस्टचे खाजगीकरण न करता कर्मचाऱ्यांना नोकरीची शाश्वती देण्याकरिता करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

**(४) श्री. चंद्रकांत नवघरे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सहकार मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

“शेतकऱ्यांनी टोकाई सहकारी लि. कुरुंद्रा ता.वसमत, जि.हिंगोली या साखर कारखान्यास ऊस दिलेला असून दिनांक १ जानेवारी ते २८ फेब्रुवारी पर्यंत कारखान्याने ऊस उत्पादक शेतकरी यांचे ऊसाचे पैसे दिलेले नसणे, या कारखान्याने खुल्या बाजारात साखर बर्गस मोलॅसेस राख हे खुल्या मार्केट विकले असून आज रोजी कारखान्यात कुठलाही माल शिल्लक नसल्याचे निदर्शनास येणे, सन २०२२-२३ या वर्षाच्या गाळपाचे अंदाजे १ लाख मेट्रीक टन ऊसाचे बील रुपये २० ते २२ कोटी शिल्लक असणे, सन २०२१-२२ या वर्षाचे ऊसाचे पैसे दिले नाहीत साखर आयुक्त, पुणे यांनी कारखान्यांवर **RRC** ची कारवाई केली व नंतर कारखाना प्रशासनाने कारखान्याची **FRP** १३ कोटी ६५ लाख रुपये शेतकऱ्यांना तीन हप्ते करुन देण्यात आल्याचे निदर्शनास येणे, आज रोजी कारखान्यात कुठलाही माल शिल्लक नसल्यामुळे साखर कारखान्याकडे सन २०२१-२२ व २०२२-२३ या वर्षातील **FRP** चे पैसे देण्याबाबत शेतकऱ्यांकडून होत असलेली आग्रही मागणी तथापि टोकाई सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष यांनी थकीत असलेले ऊसाचे २३ कोटी रुपये देणे शक्य नसल्याचे मा.साखर आयुक्त, पुणे यांना दिनांक १ मार्च, २०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आल्याचे निदर्शनास येणे, परिणामी ऊस उत्पादक शेतकऱ्यांवर आलेली उपासमारीची पाळी, त्यासाठी शासनस्तरावरुन अध्यक्ष व संचालक मंडळास जबाबदार धरुन शेतकऱ्यांचे पैसे देण्याचे शासनाने आदेश देण्याची आवश्यकता, परिणामी शेतकऱ्यांच्या मनात निर्माण झालेले भितीचे वातावरण व उदासिनतेची भावना, यावर शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया.”

**(५) श्री. जयकुमार गोरे, ॲड. राहूल कुल, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

“मायणी, ता. खटाव, जि. सातारा येथील रूरल इन्स्टिटयूट ऑफ रिसर्च सेंटर व हॉस्पिटल, मायणी या मेडिकल कॉलेजच्या प्रवेशासाठी मोठ्या प्रमाणावर बोगस कागदपत्रे तयार केली असल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली असणे, सदर मेडिकल

ॲडमिशन होत असताना संस्था चालकांनी बारावी पासचे सर्टिफिकेट, मायग्रेशन सर्टिफिकेट, तसेच शाळेचे दाखले बोगस तयार करून विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षणासाठी प्रवेश देऊन प्रक्रिया राबविली असणे, विद्यार्थ्यांना कमी मार्क असताना मेरिटमध्ये येण्यासाठी सर्व बोगस कागदपत्रे तयार करून ती शासनास सादर करून मायणी येतील रूरल इन्स्टिटयूट ऑफ रिसर्च सेंटर हॉस्पिटल येथे ॲडमिशन प्रक्रिया केली असून तेथे बोगस डॉक्टर तयार केले असे निदर्शनास आले असणे, यामध्ये तत्कलीन संस्था चालकांनी सांगणमताने हे कृत्य केले असल्याचे निदर्शनास आले असणे, यासंदर्भात दिनांक १८ मे, २०२१ रोजी मा. पोलीस अधीक्षक सातारा यांच्याकडे तक्रार दाखल केली असून त्यासंदर्भात अद्याप कोणतीही चौकशी केली नसणे, गुन्हा दाखल झालेला असताना तपास अधिकारी यांनी सूत्रधारकांना अभय दिलेला असणे, यामुळे पात्र विद्यार्थ्यांना प्रवेशास मुकावे लागल्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनात मोठा असंतोष पसरलेला असणे, असेच जाळे महाराट्र मध्ये अनेक ठिकाणी चालू असणे, यामुळे पात्र विद्यार्थ्यांच्या मनात पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने तातडीने लक्ष घालून गुन्हेगारावर कार्यवाहीची आवश्यकता व उपाययोजना."

**(६) श्री. प्रमोद पाटील, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात नागरिकरण होत असणे, महानगरपालिकेतील मुळ क्षेत्रासह २७ गावांमध्ये लोढा, रुणवाल, रिजन्सी, पॅराडाईज सारखे शेकडो एकरमध्ये सुरु असलेले मोठमोठे गृहप्रकल्प, म्हाडाच्या माध्यमातूनही अनेक बांधकामे सुरु असणे, या प्रकल्पाच्या माध्यमातून लाखो घरांची सुरु असलेली निर्मिती, डोंबिवली औद्योगिक क्षेत्र, मुळ महानगरपालिका क्षेत्रासह विस्तार झालेला असणे, निवासी विभाग औद्योगिक विभागासह मनपा क्षेत्रातील सर्व निवासी विभाग एम.आय.डी.सी. च्या बारवी डॅमवर अवलंबून असून पुरेसा पाणी कोटा व पुरवठा होत नसल्यामुळे सध्या २७ गावांसह संपूर्ण मनपा क्षेत्रात होत असलेली पाणी टंचाई, बारवी व्यतीरीक्त पाणी पुरवठ्यासाठी कोणताही इतर प्रकल्प सध्या सुरु नसल्याने भविष्यात पाण्याची परिस्थिती अधिकच बिकट होण्याची शक्यता, त्यामुळे कल्याण-डोंबिवली मनपा क्षेत्रातील वाढत्या लोकसंख्येचा विचार करून उल्हास नदीपात्रातून नवी मुंबई महानगरपालिकेस व्यपगत होणारा १४० दशलक्ष लीटर प्रतिदिन पाणी कोटा कल्याण-डोंबिवली मनपासाठी वर्ग करून उल्हास नदीच्या खोऱ्यामध्ये होणाऱ्या जलसाठ्यावर पाणी आरक्षण मिळावे व वाढीव कोटा मिळावा यासाठी सुरु असलेले प्रयत्न, याबबत वारंवार बैठका घेऊनही निर्णय घेतला जात नसणे, कडोंमपा मधील नागरीकांचे पाणी टंचाईमुळे होत असलेले हाल पाहता या प्रकरणी तातडीने लक्ष घालून कल्याण-डोंबिवली साठी आवश्यक असलेला पाणी कोटा वाढवून उल्हास नदीपात्रातून नवी मुंबई महानगरपालिकेस व्यपगत होणारा १४० दशलक्ष लीटर प्रतिदिन पाणी कोटा कल्याण-डोंबिवली मनपासाठी वर्ग करण्याबाबत तातडीने निर्णय होण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

अमुद्रित प्रत

**(७) सर्वश्री. बाळासाहेब थोरात, अमीन पटेल, अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अशोकराव चव्हाण, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), श्री.बळवंत वानखडे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"श्री.साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था शिर्डी अधिनियम, २००४ च्या अधिनियमातील द.म.सुकथनकर साहेब यांच्या अध्यक्षतेखालील समिती काळातील १९९४ ते २२/८/२००४ अखेर पर्यत चे एकूण १६८७ कर्मचारी संस्थानामध्ये काम करीत असून सन २००० पासून शिर्डी संस्थानमध्ये कार्यरत असलेल्या ५९८ कर्मचारी संस्थानामध्ये काम करीत असून सन २००० पासून शिर्डी संस्थानामध्ये कार्यरत असलेल्या ५९८ कर्मचारी तुटपुंज्या वेतनावर काम करीत असणे, या पगारावर घरखर्च तसेच मुलांचे शिक्षण करणेही जिकरीचे झाले असणे, गेल्या २० वर्षापासून हे कामगार अन्याय सोसत असून त्यातील काही रिकाम्या सेवानिवृत्तही झाले असणे, कंत्राटी पध्द्तीने घेतलेल्या ५९८ कर्मचाऱ्यांना पुर्वलक्षी प्रभावाने संस्थानच्या सन २००४ च्या अधिनियमातील कलम १६ अन्वयेच्या तरतूदीनुसार शासनाने मंजूर केलेल्या आकृतीबंधानुसार कायमस्वरुपी स्थायी कर्मचारी घेण्याबाबत कर्मचाऱ्यांकडून मागणी होत असून यापूर्वी कायम केलेल्या १०५२ कामगारांचे निकष लावून श्री. साईबाबा संस्थान आस्थापनेवर वा ५९८ कामगारांपैकी जे पात्र आहेत त्यांना श्री. साईबाबा संस्थान आस्थापनेवर कायमस्वरुपी स्थायी कर्मचारी म्हणून कायम करण्याबाबत मागणी होत असून अद्यापही याबाबत कार्यवाही करण्यात न आल्याने त्यांच्यात पसरलेली तीव्र असंतोषाची व नाराजीची भावना, याबाबत राज्य शासनाने तातडीने निर्णय घेऊन कंत्राटी पध्द्तीने काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना तात्काळ कायमस्वरुपी नियुक्ती करण्यात यावी, तसेच मंजुर आकृतीबंधाप्रमाणे माहे ऑगस्ट, २००९ पूर्वलक्षी प्रभावाने वेतनाचा फरक देण्याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

**(८) श्री. दादाराव केचे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"आर्वी विधानसभा मतदार संघातील मौजा थार, चामला, बांबर्डा, बोरखेडी, बोटोणा, पारडी, एकांबा, किन्ही मोई, मुबारकपुर ही गावे पहाडी व डोंगराळ भागात बसलेली असणे, त्या ठिकाणी पर्जन्यमान हे अत्यंत कमी असणे, त्यामुळे या भागात दरवर्षी पिण्याच्या पाण्याची व शेतीकरिता सिंचनाचा अत्यंत तुटवडा जाणवत असणे, सदर गावे ही दुष्काळग्रस्त असून त्या गावातील जनतेचा उदरनिर्वाह हा शेतीचे उत्पन्नावर अवलंबून असणे, तसेच गावातील शेतकरी शेतीसोबत जोड व्यवसाय म्हणून पशुपालन करणे, परंतु पाण्याच्या तुटवट्यामुळे त्यांना जनावरांचे स्थलांतर बाहेर गावी करावे लागणे,

त्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक परिस्थितीचा सुध्दा सामना करावा लागणे, बारमाही पाणी साठवणुकीकरिता कुठलीही व्यवस्था नसल्यामुळे दरवर्षी पाण्याचा दुष्काळ पडत असणे, त्या गावात जानेवारी महिण्यानंतर पिण्याकरिता पाणी उपलब्ध राहत नसणे, करिता या भागातील शेतक-यांना पिण्याचे पाणी व सिंचनाची सोय होण्याच्या दृष्टीने जाम नदीवर नवनिर्मीत मध्यम सिंचन प्रकल्प मंजुर करण्याकरीता जनतेचे मागणी तात्काळ मंजुर करून देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(९) प्रा. वर्षा गायकवाड, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"मुंबईतील धारावी ही आशिया खंडातील सर्वात मोठी झोपडपट्टी असणे, विभिन्न जाती आणि धर्माचे गरीब व मध्यमवर्गीय परिवार धारावीत गेली कित्येक दशकं एकजुटीने राहत असणे, या ठिकाणी अनेक लघु व मध्यम उद्योगधंदे कार्यरत असणे, या सर्वांमुळे धारावीची एक वेगळी ओळख निर्माण होणे, धारावी पुनर्विकास प्रकल्प हे देशातीलच नव्हे तर जगातील सर्वात मोठा पुनर्वसन प्रकल्प असणे, ६०,००० पेक्षा अधिक परिवारांच्या उज्ज्वल भविष्याचे स्वप्न या प्रकल्पावर अवलंबून असणे, २०१८ मध्ये संपन्न झालेल्या निविदा प्रक्रियेला बाजूला सारून शासनाने नव्याने धारावी पुनर्विकास निविदा काढणे, नव्याने बोलावलेल्या प्रक्रियेत पात्रता निकष आणि कामाच्या अनुभवाच्या अटी व शर्थीमध्ये मोठे बदल होणे, त्याविरोधात मा.उच्च न्यायालयात मागील निविदा लागलेले लोग दाद मागणे, हिंडनबर्गच्या (**Hindenburg**) अहवालामुळे मोठ्या आर्थिक अडचणीत सापडलेल्या अदानी समूह नवीन निविदा प्रक्रिया जिंकणे, सद्यस्थितीत अदानी समूहाला बाजारातून पतपुरवठा उपलब्ध करणे कठीण असणे, या पार्श्वभूमीवर धारावी पुर्नवसन प्रकल्प रखडण्याची शक्यता निर्माण होणे, यामुळे स्थानिकांत प्रकल्पाविषयी चिंता, असंतोष आणि भीतीचे वातावरण निर्माण होणे, सद्यस्थितीत अदानी समूहावर होत असलेले आरोप आणि त्यांची अस्थिर आर्थिक परिस्थिती पाहता त्यांना कामाचे आदेश (**Work Order**) न देणे आणि निविदेचा पुनर्विलोकन करण्याची तातडीची गरज असणे, याबाबत माननीय मुख्यमंत्र्यांना निवेदन दिलेले असणे, परंतु याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, परिणामी येथील नागरिकांमध्ये कमालीचा असंतोष निर्माण होणे, याबाबत शासनाने लक्ष घालून पुनर्विकास निविदा रद्द करून नव्याने निविदा प्रक्रिया राबवण्यासंदर्भात तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(१०) श्रीमती सरोज आहिरे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"नाशिक येथील एकलहरे औष्णिक वीज निर्मिती केंद्रात विद्युत विनियमासंदर्भात सोयी सुविधा उपलब्ध असणे, त्यामध्ये ६५० एकर जागा रेल्वेमार्ग, प्रशासकीय इमारती,

कामगार वसाहत, राख साठवणूक बंधारा, पाणी इत्यादी आवश्यक त्या सोयीसुविधांचा समावेश असणे, राज्यातील अव्वल वीजनिर्मिती केंद्रापैकी एकलहरे हा विद्युत प्रकल्प असणे, तसेच शासनाने एकलहरे येथे ६६० मेगावॅट प्रकल्प यापुर्वीच मंजूर केलेला असणे, तथापि शासकीय अधिकाऱ्यांच्या नाकर्तेपणामुळे हा मंजूर झालेला प्रकल्प रखडलेला असणे, वास्तविक सदर औष्णिक विद्युत प्रकल्प बंद करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला नसणे, असे तत्कालीन मा. ऊर्जा मंत्री यांचेकडून माहे जानेवारी, २०२२ मध्ये सांगण्यात येणे, एकलहरे येथील नवीन प्रकल्प सुरु झाल्यास हजारो कामगार व व्यवसायिकांना रोजीरोटी व व्यवसाय उपलब्ध होणार असल्याचे निदर्शनास येणे, तेथील मा. स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सदरचा मंजूर झालेला नवीन प्रकल्प तातडीने सुरु करण्याबाबत आग्रही मागणी करण्यात येणे, तथापि आजतागायत शासनाने प्रकल्प सुरु करण्याबाबत कोणतीही कार्यवाही केलेली नसणे, परिणामी त्या परिसरातील तरुणवर्गामध्ये तसेच व्यवसायिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, शासनाने याप्रकरणी तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**चार : सन २०२३-२०२४ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा व मतदान. (तिसरा दिवस)**

(१) ग्रामविकास विभाग

(२) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

(३) सार्वजनिक आरोग्य विभाग

(४) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग

**(मतास टाकावयाच्या मागण्यांची सूची स्वतंत्रपणे वितरीत केल्याप्रमाणे)**

**पाच : शासकीय विधेयके :**

**(अ) पुर:स्थापनार्थ :-**

सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६ – महाराष्ट्र पोलीस (सुधारणा) विधेयक, २०२३.

**(ब) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

**(१) (क) सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ — पंढरपूर मंदिरे (सुधारणा) विधेयक, २०२३.**

**(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.चेतन तुपे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ — पंढरपूर मंदिरे (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३४५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.अजित पवार, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ — पंढरपूर मंदिरे (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ६१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(घ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ — पंढरपूर मंदिरे (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ङ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ — पंढरपूर मंदिरे (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

अप्रकाशित प्रत

**(च) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, जितेश अंतापूरकर, संजय जगताप, बळवंत वानखडे, अमित झनक, शिरीषदादा चौधरी व अमिन पटेल, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ – पंढरपूर मंदिरे (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(छ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.छगन भुजबळ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ – पंढरपूर मंदिरे (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ज) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री रविंद्र वायकर व दिलीप वळसे-पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ – पंढरपूर मंदिरे (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(२) (क) सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १० – महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना (सुधारणा) विधेयक, २०२३.**

**(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.चेतन तुपे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १० – महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३४६ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

अग्रिम प्रत

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्रीमती आदिती तटकरे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १० — महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३४५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(घ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.अजित पवार, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १० — महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ६१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ङ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १० — महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(च) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १० — महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

अप्रकाशित प्रत

**(छ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, जितेश अंतापूरकर, संजय जगताप, बळवंत वानखडे, अमित झनक, शिरीषदादा चौधरी, विकास ठाकरे व अमिन पटेल, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १० — महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ज) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.छगन भुजबळ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १० — महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(झ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री रविंद्र वायकर व दिलीप वळसे-पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १० — महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

अग्रिम प्रत

**(३) (क) सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ११ — महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०२३.**

**(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.चेतन तुपे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ११ — महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३४६ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.अजित पवार, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ११ — महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ६१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(घ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ११ — महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ङ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ११ — महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(च) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, जितेश अंतापूरकर, संजय जगताप, बळवंत वानखडे, अमित झनक, शिरीषदादा चौधरी, विकास ठाकरे व अमिन पटेल, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ११ – महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(छ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.छगन भुजबळ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ११ – महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ज) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री रविंद्र वायकर व दिलीप वळसे-पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ११ – महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(गुरूवार, दिनांक १६ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

सहा : **ॲड. आशिष शेलार, श्रीमती यामिनी यशवंत जाधव, सर्वश्री योगेश सागर, सदा सरवणकर, अमित साटम, भरतशेठ गोगावले, अतुल भातखळकर, कॅप्टन आर. तमिल सेल्वन, सर्वश्री कालीदास कोळंबकर, किसन कथोरे, कुमार आयलानी, गणपत गायकवाड, गणेश नाईक, नितेश राणे, ॲड. पराग अळवणी, सर्वश्री पराग शाह, प्रशांत ठाकूर, डॉ.भारती लव्हेकर, सर्वश्रीमती मंदा म्हात्रे, मनिषा**

अप्रकाशित प्रत

**चौधरी, माधुरी मिसाळ, सर्वश्री महेश चौघुले, मिहीर कोटेचा, राम कदम, श्रीमती विद्या ठाकूर, सर्वश्री संजय केळकर, सुनील राणे, सर्वश्री प्रकाश आबिटकर, चिमणराव पाटील, मंगेश कुडाळकर, दिलीप लांडे, योगेश कदम, संजय गायकवाड, डॉ. संजय रायमुलकर, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (चर्चा पुढे सुरू व मंत्र्यांचे उत्तर)**

"जुलै, २०२२ नंतर मुंबई शहराच्या विकासाची नियोजनात्मक व कालबध्द कामे हाती घेण्यात आली असल्याची बाब निदर्शनास येणे, मुंबई हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर असून या शहराच्या नावलौकीकाला साजेसे असे ५०० पेक्षा अधिक सुशोभिकरणाचे प्रकल्प मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून मा.मुख्यमंत्री व मा.उपमुख्यमंत्री महोदयांच्या नाविन्यमय कल्पकतेतून सुरु असणे, गेल्या अनेक वर्षापासून मुंबई शहराला एसटीपी पासून दूर ठेवण्यात आले असताना मागील तीन महिन्यांमध्ये मुंबई शहरात ७ ठिकाणी एसटीपीच्या प्रकल्पांचे भुमिपूजन होऊन कामही सुरु झाल्याचे निदर्शनास येणे, मुंबई शहरात मोठ्या प्रमाणावर रस्त्यात खड्डे की खड्ड्यात रस्ते अशा प्रकारचे चित्र दिसत असून खड्डे बुजविणे व डांबरीकरणाकरिता मागील २५ वर्षात २१ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम खर्च करण्यात येऊनही मुंबई शहराच्या रस्त्यांची प्रचंड दुरावस्था झाली असल्याने मुंबईकरांच्या मनामध्ये निर्माण झालेली उद्विग्नता, मागील ६ महिन्यांमध्ये विद्यमान शासनाने महानगरपालिकेला आदेश दिल्यानंतर मुंबई शहराच्या ४५० कि.मी. रस्त्यांच्या काँक्रिटीकरणाची ६ हजार कोटीपेक्षा जास्त रक्कमेची निविदा काढण्यात येऊन त्यासंदर्भातील वर्कऑर्डर्स निघाल्यानंतर संबंधित कामांचे भुमिपूजन मा.पंतप्रधानांच्या हस्ते झाले असणे, मुंबई शहरात मोठ्या प्रमाणावर सन २०१४ ते २०१९ या कालावधीमध्ये सुमारे ३०० कि.मी. मेट्रोचे काम सुरु होऊन मध्येच खोळंबल्याची बाब निदर्शनास येणे, आरे कारशेडच्या मुद्दयामुळे मुंबईच्या मेट्रोच्या कामात विलंब झाल्याने मेट्रो कारशेडच्या खर्चात १० हजार कोटीपेक्षा अधिक वाढ झाल्याचे आढळून येणे व परिणामी मेट्रोचे अपेक्षित ध्येय अद्यापही गाठता न येणे, मेट्रो २-ए आणि २-बी ची सेवा सुरु झाल्याने पश्चिम द्रुतगती मार्गावरील अंधेरी आणि दहिसर यामध्ये वाहतुक कोंडी कमी होऊन मुंबईकरांचा प्रवास सुकर झाल्याचे निदर्शनास येणे, विद्यमान शासनाने मेट्रो प्रकल्पांचे काम जलद गतीने सुरु केल्याने सन २०२४ ते २०२६ या कालावधीत मेट्रो तसेच कोस्टल रोड प्रकल्प पुर्ण होण्याचे स्वप्न दृष्टीपथास आल्याने मुंबईकरांचे जीवनमान उंचावले असून मुंबईची तकदीर व तसबीर बदलली असल्याची बाब दिसून येणे, मुंबईतील कोळीवाडा आणि गावठाणाकरिता सिमांकन करुन वेगळी विकास नियंत्रण नियमावली तयार करण्याची प्रक्रिया अद्यापही प्रलंबित राहिल्याने मुंबईतील कोळीवाडे व गावठाणांची झालेली दुरावस्था तातडीने विचारात घेण्याची आवश्यकता, मुंबईतील रेल्वे स्थानकांच्या दोन्ही बाजूकडील झोपडीधारकांच्या पात्रता निश्चितीसाठी एक खिडकी व कालबध्द स्थलांतरण योजना तयार करण्याची आवश्यकता, मुंबईतील उपकरप्राप्त जुन्या व मोडकळीस आलेल्या खाजगी इमारतींचा पुर्नविकास करण्याचे तसेच, एसआरए प्रकल्पबाधितांच्या न्यायप्रविष्ठ

अप्रकाशित प्रत

प्रकरणाबाबत शासनाचे धोरण, मुंबई शहरात दिड लाख फेरीवाले पात्रताधारक असूनही त्यांना जागेचे वाटप करण्यात न आल्याने पदपथांवर ते व्यवसाय करीत असल्याचे निदर्शनास येणे, त्यांच्याकरिता मार्केट झोन निर्माण करण्याची आवश्यकता, जेणेकरुन पदपथ मोकळे होऊन वाहतुक कोंडी होणार नाही, मागील २५ वर्षात मुंबई महानगरपलिकेच्या स्थायी समितीमार्फत किमान ३ लाख कोटींपेक्षा जास्त कामाच्या निविदा मंजूर होऊन त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचे निदर्शनास येणे, कोविडच्या काळात वैद्यकीय साहित्य खरेदी-विक्रीच्या विभागात हजारो कोटींचा भ्रष्टाचार झाल्याची बाब निदर्शनास येणे, टॅब खरेदी, सफाई कामगार वसाहत पुनर्विकासाच्या आश्रय योजनेमध्ये १८०० कोटींचा भ्रष्टाचार झाल्याची बाब निदर्शनास येणे, मुंबई महानगरपालिकेंतर्गत मागील शासनाच्या काळात जिजामाता उद्यान प्राणी संग्रहालयांच्या आधुनिकीकरणाचा प्रकल्प, ९०० इलेक्ट्रीक बसेसची खरेदी यामध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचे निदर्शनास येणे, मुंबई व उपनगरात रिक्षा व खाजगी वाहनांच्या पार्किंगकरिता बहुमजली वाहनतळे उभी करण्याची आवश्यकता, देशातील प्रदुषणग्रस्त शहरामध्ये मुंबईचा अग्रक्रम असल्याचे निदर्शनास आल्याने शहरातील नालेसफाई करण्याकरिता आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याची व मुंबई आणि उपनगरातील कचऱ्याची वैज्ञानिक पध्दतीने विल्हेवाट लावण्याची योजना कार्यान्वित करण्याची आवश्यकता, मुंबईत गोवंडीतील डंम्पिंग ग्राऊंड आणि जैववैद्यकिय कचऱ्यावरील प्रक्रिया प्रकल्पांमुळे गोवंडी, शिवाजीनगर, देवनार परिसरात मागील १० वर्षांत झालेला अंदाजे १,८७७ जणांचा मृत्यू, प्रदूषणामुळे मुंबईतील नागरिकांना मोठ्या प्रमाणावर होत असलेली क्षयरोगाची बाधा, पर्यावरण संतुलन राखण्यासाठी मोजता येईल अशा पॅरामिटरच्या (कॉन्टीटेटीव्ह गोल्सच्या) आधारावर पर्यावरण धोरण आखून कार्यवाही करण्याची आवश्यकता, मुंबई व उपनगरातील महानगरपालिका, नगरपालिका क्षेत्रात भरावा लागणारा बिनशेतीकर रद्द करण्याची आवश्यकता, विद्यमान शासनाच्या काळात कायदा व सुव्यवस्थेमध्ये झालेली प्रचंड सुधारणा, त्यामुळे मुंबईकर मोकळा श्वास घेत असल्याची बाब निदर्शनास येणे, कॅगच्या लेखा परिक्षण अहवालातील वस्तुस्थितीदर्शक सत्त्यता मुंबईकरांपुढे येण्याची आवश्यकता, मुंबईमध्ये डबेवाला भवन व मराठी भाषा भवन तातडीने निर्माण करण्याची आवश्यकता, मुंबई महापालिकेची मान्यता न घेता जवळपास १९४ अनधिकृत शाळा सुरू असल्याची बाब निदर्शनास येणे, मुंबई महानगरपालिकेंतर्गत मराठी शाळांची पटसंख्या दिवसेंदिवस रोडावल्याची बाब निदर्शनास येत असल्याने मराठी शाळांना आधुनिकतेची व कौशल्य विकास अभ्यासक्रमाची जोड देऊन मराठी विद्यार्थी व पालकांना मराठी भाषेच्या शाळांकडे आकर्षित करण्याची आवश्यकता, मुंबईतील रुग्णालयांमध्ये मुंबईबाहेरून येणाऱ्या रुग्णांची संख्या अधिक असल्याने व अनेकांना अतिदक्षता विभागात ठेवून उपचार करण्याची गरज असल्याने तेवढ्या प्रमाणात व्हेंटीलेटर उपलब्ध नसल्याचे निदर्शनास येणे, मुंबईतील महापालिका व सरकारी रुग्णालयात व्हेंटीलेटरची संख्या वाढविण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(गुरूवार, दिनांक १६ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सात : सर्वश्री. अजित पवार, बाळासाहेब थोरात, जयंत पाटील, नानाभाऊ पटोले, छगन भुजबळ, अशोकराव चव्हाण, पृथ्वीराज चव्हाण, आदित्य ठाकरे, अजय चौधरी, दिलीप वळसे-पाटील, सुनिल प्रभू, डॉ. नितिन राऊत, सर्वश्री भास्कर जाधव, धनंजय मुंडे, रविंद्र वायकर, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), सर्वश्री राजेश टोपे, सुनिल केदार, विजय वडेट्टीवार, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री अमित देशमुख, अनिल देशमुख, अबू आजमी, विनोद निकोले, रईस शेख, बाळासाहेब पाटील, सुरेश वरपुडकर, अनिल पाटील, संग्राम थोपटे, ॲड. माणिकराव कोकाटे, सर्वश्री राजन साळवी, दिलीपराव बनकर, चेतन तुपे, सुनिल शेळके, ॲड. के. सी. पाडवी, सर्वश्री शिरीष चौधरी, अस्लम शेख, प्रा. वर्षा गायकवाड, श्री. अमीन पटेल, कुमारी प्रणिती शिंदे, डॉ. विश्वजित कदम, डॉ. राजेंद्र शिंगणे, सर्वश्री सुनिल राऊत, कुमारी आदिती तटकरे, श्रीमती सरोज आहिरे, सर्वश्री दिलीप मोहिते-पाटील, दत्तात्रय भरणे, ॲड. अशोक पवार, सर्वश्री सुनिल टिंगरे, प्राजक्त तनपूरे, रोहित पवार, निलेश लंके, आशुतोष काळे, संजय बनसोडे, बबनराव शिंदे, यशवंत माने, दिपक चव्हाण, मकरंद जाधव-पाटील, शेखर निकम, राजेश पाटील, श्रीमती सुमन पाटील, सर्वश्री मानसिंग नाईक, देवेंद्र भुयार, संजयमामा शिंदे, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री धर्मरावबाबा आत्राम, दौलत दरोडा, सुनिल भुसारा, अतुल बेनके, अण्णा बनसोडे, संग्राम जगताप, वैभव नाईक, संजय पोतनीस, श्रीमती ऋतुजा लटके, सर्वश्री कुणाल पाटील, विकास ठाकरे, कैलास गोरंट्याल, संजय जगताप, रणजीत कांबळे, लहू कानडे, ऋतुराज पाटील, राजु आवळे, पी. एन. पाटील (सडोलीकर), विक्रमसिंह सावंत, नितीन पवार, शिरीषकुमार नाईक, डॉ. राहूल पाटील, अमित झनक, राजु पारवे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री मनोहर चंद्रिकापूरे, इंद्रनिल नाईक, चंद्रकांत नवघरे, राजू कारेमोरे, प्रकाश सोळंके, संदिप क्षिरसागर, बाळासाहेब आजबे, बाबासाहेब पाटील, डॉ. किरण लहामटे, सर्वश्री रमेश कोरगांवकर, कैलास घाडगे-पाटील, नितीन देशमुख, उदयसिंग राजपुत, राजेश एकडे, बळवंत वानखडे, सहसराम कोरोटे, सुभाष धोटे, मोहनराव हंबर्डे, जितेश अंतापूरकर, हिरामण खोसकर, झीशान सिद्दिकी, श्रीमती जयश्री जाधव, सर्वश्री. माधवराव पवार, धिरज देशमुख, रवींद्र धंगेकर, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :**

राज्यातील नगरपालिका व महानगरपालिकांमधील प्रभाग व सदस्य संख्येची फेररचना, प्रभाग रचनेचे अधिकार स्वत:कडे घेण्याचा शासनाचा निर्णय, ९६ नगरपालिकांमध्ये ओबीसी आरक्षण, यासह न्यायालयात प्रलंबित असलेल्या

प्रकरणांमुळे निवडणुका दीर्घकाळ रखडल्या असणे, राज्यातील महानगरपालिकांत, विशेषत: मुंबई महानगरपालिकेत प्रशासकांकडून प्रकल्प रद्द वा स्थगित केले असणे, दुसऱ्या बाजूला जनप्रतिनिधी नसताना नवीन योजना व प्रकल्पांची घोषणा करुन निधीची उधळपट्टी होत असणे, मेट्रो प्रकल्पग्रस्तांच्या घरवाटपात झालेली अनियमितता, मुंबईत विनापरवाना पाणी उपसा करुन होणारी विक्री, मुंबईतील "बेस्ट" ही सार्वजनिक वाहतूक व्यवस्था आर्थिक अडचणीत आली असणे, सौंदर्यीकरणाच्या नावाखाली महानगरपालिकेच्या निधीची होत असलेली उधळपट्टी, मुंबईतील रस्त्यांचे कॉंक्रीटीकरणाचे काम सुरु झाले नसताना कंत्राटदारांना आगाऊ रकमांची वाटण्यात आलेली खिरापत, मुंबई महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात प्रभागनिहाय निधी वाटपात झालेला भेदभाव, नालेसफाईत होत असलेला विलंब, विक्रोळी कन्नमवार नगर येथील ३८ सोसायट्यांच्या पुनर्विकासातील अडथळा दूर करण्याची गरज, फिल्म सिटी, गोरेगाव ते शिंडीपाडा, मुलुंड या दुहेरी बोगद्याच्या कामासाठी काढलेल्या निविदेत झालेल्या अनियमितता, केईएम रुग्णालयात रुग्ण सहायता निधीत झालेला घोटाळा, आपला दवाखान्यांमध्ये असलेला औषधांचा तुटवडा, नादुरुस्त उपकरणे, केईएम व इतर रुग्णालयात सीटीस्कॅन, एमआरआयसारख्या मशीन बंद असणे, गोखले ब्रीजच्या पाडकामामुळे मुंबईच्या पश्चिम उपनगरात वाहतूकीचा उडालेला बोजवारा, मुंबईत वाढलेले धुळीचे साम्राज्य व प्रदूषण, सफाई कामगारांच्या आश्रय योजनेत निर्माण झालेल्या समस्या, महारेराने ५१ टक्के खरेदीदारांच्या मंजुरीची अट काढून टाकण्याचा घेतलेला धक्कादायक निर्णय, गिरणी कामगारांच्या घरांचा प्रलंबित प्रश्न, ठाणे महानगरपालिकेतील मग्रुर व मस्तवाल सहाय्यक आयुक्तांचे गॅंगस्टरशी असलेले संबंध त्यात त्यांनी अनेक बेकायदेशीर कामे केली असल्याचे तसेच गुंडाच्या माध्यमातून लोकप्रतिनिधींना धमकावत असल्याचे उघडकीस येणे, ठाण्यातील समूह पुनर्विकास योजनेची घोषणा झाली असली तरी अंमलबजावणी होत नसणे, ठाणे शहर सार्वजनिक परिवहन सेवा मोडकळीस आली असणे, धारावी पुनर्विकास प्रकल्प व अन्य प्रकल्पांसाठी नेमलेल्या कंत्राटदार कंपनीविरोधातील गंभीर आरोपांमुळे प्रकल्प अडचणीत आले असणे, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या प्रधानमंत्री आवास योजनेत झालेला गैरव्यवहार, पनवेल व उरण तालुक्यात नैना प्रकल्पांतर्गत घातलेल्या जाचक अटींना होणारा विरोध, नवी मुंबईतील भूमीपुत्रांनी बांधलेली घरे नियमित करण्याचा रखडलेला निर्णय, स्थानिक स्वराज्य संस्थांमधील रिक्त पदे, पुणे महानगरपालिकेत विकासकांचा वाजलेला बोजवारा, मेट्रो सेवेचे विस्तारीकरण, पुणे महानगर विकास प्राधिकरणाचा आराखडा, रिंग रोडचे भूसंपादन, यात होत असलेला विलंब, विविध महापालिकांतून वगळलेल्या गावांच्या विकासाचा निर्माण झालेला प्रश्न, भिवंडी शहरात पंतप्रधान आवास योजनेचे थांबलेले काम, म्हाडाकडे देण्यात आलेले अधिकार शासनाने पुन्हा आपल्याकडे घेतल्याने निर्णयांना विलंब होत असणे, म्हाडा वसाहतीतील गृहनिर्माण संस्थांवर वाढीव सेवा शुल्काचा लादलेला बोजा, झोपु योजनेतील विकासकांकडून थकीत घरभाड्याची तातडीने वसुली करण्याची

अग्रिम प्रत

आवश्यकता, मुंबईतील सेस इमारतींचा रखडलेला पुनर्विकास, राज्याच्या आरोग्य विभागात सुमारे १७ हजार पदे रिक्त असणे, शासकीय रुग्णालयात औषधांचा असणारा तुटवडा, राज्यात एच३एन२ विषाणूचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता, एकूणच आरोग्य व्यवस्थेकडे सरकारचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, कट प्रॅक्टिसच्या माध्यमातून रुग्णांचे होणारे शोषण थांबवण्यासाठी कठोर कायदा करण्याची आवश्यकता, निवासी डॉक्टरांच्या मागण्यांकडे सरकारचे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**अशासकीय कामकाज**

**(बैठकीच्या अखेरचे २ १/२ तास)**

**आठ : अशासकीय विधेयके :-**

**(शुक्रवार, दिनांक १० मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या अशासकीय विधेयकाच्या सूचना)**

**पुर:स्थापनार्थ :**

(१) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३० - महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०२१- **श्री. संजय सावकारे, वि.स.स. यांचे.**

(२) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३२ - महाराष्ट्र राज्यातील बेरोजगार युवक-युवतींना बेरोजगार भत्ता विधेयक,२०२१ — **श्री.प्रकाश आबिटकर, वि.स.स. यांचे.**

(३) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३४ - महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुराणवस्तुशास्त्रविषयक स्थळे व अवशेष (सुधारणा) विधेयक, २०२१ - **श्री. सुहास (आण्णा) कांदे, वि.स.स. यांचे.**

(४) सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ०२ - भारतीय दंड संहिता आणि फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२२ - **श्री संजय सावकारे, वि.स.स. यांचे.**

अप्रकाशित प्रत

(५) सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ०८ - महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था (सुधारणा) विधेयक,२०२२ - **ॲड राहुल कुल, वि.स.स. यांचे.**

(६) सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक २४ - महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०२२ – **श्री. संजय सावकारे, वि.स.स. यांचे**.

(७) सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक २५ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) विधेयक, २०२२ - **ॲड राहुल कुल, वि.स.स. यांचे.**

(८) सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४० - महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन (सुधारणा) विधेयक, २०२२ - **श्री. प्राजक्त तनपुरे, वि.स.स. यांचे.**

(९) सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४१ – महाराष्ट्र परदेशातील रोजगार संरक्षण विधेयक, २०२२ – **डॉ.राहुल वेदप्रकाश पाटील, वि.स.स. यांचे.**

**नऊ : अशासकीय ठराव (म.वि.स. नियम १०६ अन्वये) :-**

**(शुक्रवार, दिनांक ३ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या अशासकीय ठरावाच्या सूचना)**

(१) **श्री. प्रताप अडसड, वि.स.स. यांचा ठराव क्र. १३३**

"राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगाराअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षात घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधित प्रश्नांवर उपाययोजना सुचविण्यासाठी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

अस्वाक्षरित प्रत

(२) **श्री. चेतन तुपे, वि.स.स. यांचा ठराव क्र. १७**

"राज्यातील पुणे, नाशिक, कोल्हापूर, औरंगाबाद, अमरावती आणि इतर महानगरपालिकामधील लोकसंख्येत झालेली भरमसाठ वाढ, नव्याने निर्माण झालेल्या मोठया वसाहती, त्यामुळे निर्माण होणाऱ्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्याची निर्माण झालेली गंभीर समस्या, लगतच्या ग्रामीण परिसरात महानगरांमधील कचरा टाकताना या कचऱ्यावर योग्य प्रक्रिया न झाल्यामुळे कचरा डेपोच्या परिसरातील नागरीकांच्या आरोग्यास निर्माण होत असलेला धोका व त्यामुळे होणारे प्रदूषण, त्यामुळे ग्रामीण भागात कचरा टाकण्यास ग्रामस्थांचा होणारा तीव्र विरोध, परिणामी नगरवासियांच्यात संघर्ष होण्याची निर्माण झालेली शक्यता इ.बाबींना आळा घालण्यासाठी राज्य पातळीवर स्वतंत्र कचरा प्रक्रिया आणि कचरा व्यवस्थापन महामंडळ स्थापन करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३) **प्रा. डॉ. अशोक उईके, वि.स.स. यांचा ठराव क्र. ५९**

"राज्यात राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावर मोठया प्रमाणात होत असलेले अपघात, अपघातस्थळी अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी शासकीय रुग्णालये नसणे, या अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी राज्यमार्ग, राष्ट्रीय महामार्गावर सार्वजनिक आरोग्य विभागाच्या माध्यमातून लहान-लहान उपचार केंद्रे सुरु करणे, सदरची उपचार केंद्रे सुरु झाल्यास तेथे वैदयकीय अधिकारी, स्टाफ नर्सेस व इतर कर्मचारी यांची नेमणूक केली गेली तर सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार मिळणे, राज्यातील बेरोजगारी दूर होण्यास मदत होणे, तसेच अपघातग्रस्तांना वेळीच उपचार मिळणे, यासाठी राज्यमार्ग व राष्ट्रीय महामार्गावर ५० कि.मी. अंतरावर प्रत्येक ठिकाणी एक-एक उपचार केंद्र उघडण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(४) **प्रा. डॉ. अशोक उईके, वि.स.स. यांचा ठराव क्र. ६९**

"राज्यातील वेगवेगळ्या प्रकल्पांमुळे विस्तापित झालेल्या विशेषत: यवतमाळ जिल्हयातील बेंबळा प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम अद्यापही पूर्ण झालेले नसल्याने विस्थापितांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विचाराधीन प्रकल्पांसाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध, त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर अडचणी, इ.बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे रखडलेले काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी कालबध्द धडक कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

अप्रकाशित प्रत

(५) **श्रीमती मोनिका राजळे, वि.स.स. यांचा ठराव क्र. २३१**

"दारिद्रय रेषेखालील कुटूंबाची यादी तयार करताना राज्यात अनेक कुटूंबाचे सर्वेक्षण न होणे, त्यामुळे खरोखरच दारिद्रय रेषेखाली असणाऱ्या कुटूंबाना पिवळया रंगाच्या शिधापत्रिकांपासून वंचित रहावे लागणे, शासनाच्या वतीने रुपये १५,००० उत्पन्न मर्यादा ठरविणे, मात्र वाढती महागाई आणि रुपयाचे झालेले अवमूल्यन यामुळे ५०,००० वार्षिक उत्पन्न मर्यादा पात्र धरण्याची गरज निर्माण होणे, यामुळे राज्यातील आर्थिकदृष्टया दुर्बल जनतेला दारिद्रय रेषेखालील योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे इष्टांक वाढवून घेण्याची मागणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(६) **श्री. संजयमामा शिंदे, वि.स.स. यांचा ठराव क्र. २१९**

"राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व रोजगाराअभावी त्यांच्यात निर्माण झालेले वैफल्य विचारात घेता बेरोजगारांच्या समस्या परिणामकारकपणे सोडविण्यासाठी एक सक्षम व स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

असुधारित प्रत

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : १६ मार्च, २०२३

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा